# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** निगडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0446 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**13/07/2026 17:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 8
**Date From (दिनांक पासून):** 13/05/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 13/05/2026
**Time From (वेळेपासून):** 22:29 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 23:36 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/07/2026 **Time (वेळ):** 16:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 036
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/07/2026 16:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** हटेल श्रीकष्ण, सेक्टर 25, निगडी प्राधिकरण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शैलजा शशिकांत शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे ,निगडी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे ,निगडी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7722011255

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | तानाजी कदम | | | 1. चाकण उत्तर पोलीस स्टेशन , पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,निगडी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद तारीख 13/07/2026

मी शैलजा शशिकांत शिंदे, वय-36 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 7722011255.

मी वरीलप्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 12/05/2026 रोजी 16.00 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रभारी प्रशासन अधिकारी श्री.सतीश वाळके, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कक्षात बोलवुन त्यांचे कक्षात हजर असलेले तक्रारदार श्री. माधव मलिकार्जुन मनोरे, वय -54 वर्षे, व्यवसाय – जमिन खरेदीविक्री, रा. 15, एम स्ट्रीट सोसायटी, रहाटणी, पुणे 17 यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. तसेच प्रभारी पोलिस उप-अधिक्षक,(प्रशासन) ला.प्र.वि पुणे यांनी तात्काळ आम्हाला सदर कारवाई करीता पुणे महानगरपालिका येथील दोन पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री मनोरे यांना आमचे कक्षात घेऊन आलो व तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी त्यांची तक्रार तोंडी कथन केली. परंतु तक्रारीबाबत त्यांना सविस्तर माहिती देता न आल्यामुळे आम्ही त्यांचेकडे तक्रारीसंबंधातील कागदपत्रांची मागणी केली. परंतु त्यावेळी तक्रारदार यांचेकडे तक्रारीसंदर्भात कोणतीही कागदपत्रे नसल्याने त्यांनी दिनांक 13/05/2026 रोजी कागदपत्रे घेऊन येतो असे सांगितले.

त्याप्रमाणे दिनांक 13/05/2026 रोजी तक्रारदार हे त्यं◌ाच्या तक्रारीसंबंधीत सर्व कागदपत्रे घेऊन सायंकाळी 16/00 वा. पो.नि.शिंदे यांचे ला.प्र.वि.पुणे कार्यालयातील कक्षामध्ये हजर झाले. तसेच त्यांची तक्रार तोंडी कथन केली. त्यावेळीच श्री सतीश वाळके, पोलीस उपअधिक्षक, प्रशासन अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे भुमी अभिलेख कार्यालय हवेली येथील दोन पंच आमचे कक्षात हजर झाले. त्यावेळी त्यांनी त्यांची ओळख सांगुन त्यांची नावे अनुक्रमे पंच क्र.1 श्री परेश विनायक राऊत, वय 26 वर्षे, व्यवसाय – नोकरी, पद - भूकरमापक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, कार्यालय हवेली, रा. सर्वे नं.176, सोनाई शाळेसमोर, भेकराईनगर, फुरसं◌ुगी पुणे. पंच क्र. 2) श्री रवि खेमराज परदेशी वय 45 वर्षे, पद भूकरमापक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय हवेली रा. फलॅट नं.101, रायचंद्र हवेली सोसायटी, लेन नं. 5, कवडेवाडी, कोरेगाव पार्क पुणे सापळा पथक अशी असल्याची सांगीतली. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री मनोरे यांचेकडील कागदपत्रांची व दिलेल्या तक्रारीची खात्री करुन आम्ही पंचांची व सापळा पथकाची तक्रारदार यांचेशी ओळख करुन दिली ओळख करुन घेतली. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील कागदपत्रांची व तोंडी कथन केलेल्या तक्रारीची खात्री करुन पुढील कारवाई ही आज दिनांक 13/05/2026 रोजी 16/00 वा करण्याचे ठरविले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री मनोरे यांना त्यांची लोकसेवकाविरुध्दची तक्रार तोंडी कथन करण्यास सांगुन त्यांच्या स्वहस्ताक्षरात देण्याबाबत कळविले. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, त्यांना मराठी वाचता येते परंतु व्यवस्थित लिहता येत नाही. त्यामुळे त्यांचा अर्ज त्यांचे सांगणेप्रमाणे आम्ही टंकलखित करावा अशी विनंती केल्याने आम्ही तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचा अर्ज मराठीमध्ये संगणकावर टंकलिखीत केला तो खालीलप्रमाणे.

“ मी श्री. माधव मलिकार्जुन मनोरे, वय -54 वर्षे, व्यवसाय – जमिन खरेदीविक्री, रा. 15, एम स्ट्रीट सोसायटी, रहाटणी, पुणे 17 या ठिकाणी एक वर्षापासुन माझी पत्नी नामे सुमित्रा वय 45 वर्षे, मोठा मुलगा विश्वनाथ, वय 32, व्यवसाय वकील, दुसरा मुलगा सोमनाथ वय 28 वर्षे, व्यवसाय जमिन खरेदीविक्री, तिसरा मुलगा शिवरत्न, वय 17 वर्षे, व्यवसाय शिक्षण व मुलगी ज्ञानेश्वरी, वय 18 वर्षे, व्यवसाय शिक्षण यांचेसह राहणेस आहे. सन 2002 पासुन माझा जमिन खरेदीविक्रीचा व्यवसाय आहे. सन 2021 पासुन सदर व्यवसाय मी

भागीदारीमध्ये करत आहे.

माझे विरोधात श्री गजानन विठ्ठल कर्णे, रा रहाटणी ता हवेली जि पुणे यांनी दस्त क्र 7790/2021 हया दस्तामधील लिहुन घेणार क्र 18 उमेश शंकर गाडे यांचे ऐवजी माझे सांगणेवरुन माझा मोठा मुलगा नामे विश्वनाथ माधव मणोरे यांनी लिहुन घेणार क्र 18उमेश शंकर गाडे यांची सही व अंगठा करुन बनावट कागदपत्र तयार केली आहेत असा अर्ज केला आहे. सदर अर्ज चाकण उत्तर पोलीस ठाणे येथे ब वर्ग अर्ज क्र 57/2026 अन्वये दाखल आहे.

तसेच श्री गजानन विठ्ठल कर्णे, रा रहाटणी ता हवेली जि पुणे यांनी दस्त क्र 2336/2022 हया दस्तामधे मी व माझा मुलगा नामे विश्वनाथ मल्लीकार्जुन मणोरे यांनी संगनमताने गाडे यांनी कोणत्याही घोषणापत्रावर सही केलेली नसताना माझा मुलगा विश्वनाथ मणोरे यांनी घोषणापत्र लिहुन अर्जदार यांची बनावट सही केली आहे.असा दुसरा अर्ज केला आहे. सदर अर्ज चाकण उत्तर पोलीस ठाणे येथे ब वर्ग अर्ज क्र 58/2026 अन्वये दाखल आहे.

सदर अर्ज चौकशीचे अनुषंगाने दिनांक 9 एप्रिल 2026 रोजी चाकण उत्तर पोलीस ठाणे दत्ता टोके यांनी त्यांचे मोबाईल क्र 9822914191 यावरुन माझे वर नमुद मोबाईलवर वॅाटसअॅप कॉल करुन जबाब देणेकामी बोलविले. त्याच दिवशी मी स्वत: चाकण पोलीस ठाणे येथे गेलो. त्यावेळी दत्ता टोके हे मला तेथील वरीष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचेकडे घेवुन गेले. जितेंद्र कदम सर यांनी मला माझेविरोधातील अर्ज क्र 57/2026 व अर्ज क्र 58/2026 असे दोन्ही अर्ज दाखवुन सदर दोन्ही अर्ज वरीष्ठ कार्यालयाकडुन आल्याने गुन्हा नोंद करावा लागेल असे सांगितले. त्यानंतर जबाब न नोंदविता आम्ही तेथुन निघुन गेलो. त्यानंतर दिनांक 18/04/2026 रोजी मी व माझे मुलाने मा अतिरिक्त जिल्हा व विषेश न्यायालय, खेड, जि पुणे येथे अटकपुर्व जामीनाकरीता 153/2026 व 154/2026 अन्वये अर्ज दाखल केला. सदर अर्जाचे सुणावणीकामी मा न्यायालयाने पोलीस ठाणेस नोटीस बजावली, त्यानंतर चाकण उत्तर पोलीस ठाणे जा क्र 1101/2026 दिनांक 22/04/2026 अन्वये जितेंद्र कदम, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, चाकण उत्तर पोलीस ठाणे यांनी तक्रारअर्ज ब क्र 57/2026 व 58/2026 चे जबाब देणेकामी हजर राहणेबाबत मला व माझे मुलाला समजपत्र पाठविले. त्यावर जितेंद्र कदम सर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांचे सदर अर्ज चौकशी सुरु असलेबाबतचे जा क्र 1101/2026 व जा क्र 1102/2026 अन्वये म्हणणे घेवून त्यांचेतर्फे ए पी आय दगडे सर हे हजर होते. मा न्यायालयाने त्यांना सदर अर्ज चौकशीमध्ये आम्हाला पुर्व सुचना देवुन अटक न करण्याच्या अटीशर्तीवर माझा अर्ज मागे घेतला व सदर प्रकरणाशी संबंधीत इतर व्यक्तींचे जबाब नोंद करण्याबाबत सुचित केले.

त्यानंतर दिनांक 24/04/2026 रोजी मी व माझा मुलगा विश्वनाथ असे चाकण उत्तर पोलीस ठाणे येथे गेलो असता रायटर टोके यांनी माझा व माझे मुलाचा जबाब नोंद केला. त्यानंतर टोके पुन्हा मला कदम सर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांचेकडे घेवुन गेले. मी कदम सर यांना जबाब नोंद केल्याचे सांगितले. त्यानंतर मी बाहेर आलो असता रायटर टोके यांनी मला ए पी आय तानाजी कदम यांना भेटण्यास सांगितले. मी ए पी आय तानाजी कदम यांचे केबीन मध्ये गेलो असता ए पी आय कदम सर तेथे नव्हते. त्यामुळे आम्ही तेथुन निघुन गेलो.

त्यानंतर दिनांक 05/05/2026, दिनांक 07/05/2026 दिनांक 08/05/2026 व दिनांक 09/05/2026 रोजी मला माझे वर नमुद मोबाईलवर ए पी आय तानाजी कदम यांचे मोबाईल क्र 9594905013 यावरुन वॅाटस अॅप कॉल आले व ते वारंवार मला सदर अर्जाचे अनुषंगाने पोलीस स्टेशनला भेटायला बोलविले. परंतु मला जाणे शक्य झाले नाही. तेव्हा दिनांक 11/05/2026 रोजी ए पी आय तानाजी कदम यांचा त्यांचे मोबाईल क्र 9594905013 यावरुन मला माझे वर नमुद मोबाईल क्र वर वॅाटसअॅपवर कॉल आला व त्यांनी मला रंगला पंजाब हॅाटेल, रावेत येथे रात्री 10:30 वाजता भेटण्यास बोलविले. त्या दिवशी रात्री 10:30 वाजता मी व माझा मित्र नामे उमेश शिवाजीराव गुंड असे त्यांना रंगला पंजाब हॅाटेल येथे भेटलो असता, त्यांनी मला सांगितले की, ‟ तुमचेविरोधात असणारे नमुद दोन्ही अर्ज हे मा वरिष्ठांनी माझेकडे सोपवले आहेत. मी तुमचे दोन्ही अर्ज दिवाणी बाब म्हणुन निकाली काढतो. तुम्हाला त्याकरता किती पैसे दयावे लागतील तो आकडा मी वरिष्ठांना विचारुन सांगतो.‟ असे सांगितले.

त्यानंतर दिनांक 12/05/2026 रोजी सकाळी 11:21 वाजता ए पी आय तानाजी कदम यांचा त्यांचे मोबाईल क्र 9594905013 यावरुन माझे वर नमुद मोबाईल क्रमांकावर वॅाटसअॅप कॉल आला व ‟वरिष्ठांसोबत माझे बोलणे झाले असुन तुमचे दोन्ही तक्रारअर्ज दिवाणी बाब म्हणुन निकाली काढण्याकरीता 10,00,000/- रुपये मागितले आहेत,‟ असे सांगितले.

सदर अर्जाबाबत चाकण उत्तर पोलीस ठाणेचे ए पी आय तानाजी कदम यांनी मा. न्यायालयाने सुचना देवूनही माझे व माझे मुलाचे विरोधातील अर्ज ब क्र 57/2026 व अर्ज क्र 58/2026 चे संबंधित इतर व्यक्तीकडे चौकशी न करता फक्त माझी व माझे मुलाची चौकशी करुन सदर अर्ज दिवाणी बाब म्हणुन निकाली काढण्याकरीता मा वरीष्ठांचे नाव

सांगून ए पी आय तानाजी कदम यांनी रक्कम 10,00,000/- रुपये लाच मागितली असुन, ती देण्याची माझी इच्छा नसल्याने मी आज रोजी ए पी आय तानाजी कदम, चाकण उत्तर पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड यांचेविरोधात पुढील कारवाई होण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे आलो आहे.
माझे आणि ए पी आय तानाजी कदम यांचेमध्ये कोणतेही पुर्ववैमनस्य तसेच आर्थिक देवाण घेवाण किंवा उसणवारी नाही. तरी ए पी आय तानाजी कदम यांचेविरुद्ध ला प्र वि कार्यालयाकडुन कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे."
असा सविस्तर अर्ज टंकलिखीत केल्यावर अर्जाची प्रिंट काढुन आम्ही तक्रारदार यांना वाचण्यास दिली. त्यावेळी त्यांनी अर्जातील मजकुर त्यांचे सांगणेप्रमाणे असल्याची वाचुन खात्री केली. त्यानंतर तक्रारदार व पंच साक्षीदार यांनी अर्ज वाचुन त्यावर दिनांकासहीत स्वाक्षरी केली व आम्ही समक्ष म्हणुन अर्जावर स्वाक्षरी केली.
त्यानंतर सदर गोपनीय कारवाई करीता पंच क्र.1 म्हणुन परेश विनायक राऊत व पंच क्र.2 म्हणुन रवि खेमराज परदेशी हे काम करतील, असे ठरविण्यात आले. सदर तक्रारीची पडताळणी ही निगडी प्राधिकरण लेन नं.25 या ठिकाणाहुन करण्याचे ठरले, त्याप्रमाणे मी तक्रारदार श्री मनोरे यांना त्याचे चारचाकी वाहन फॉच्युनर चारचाकी वाहन क्र. एम एच 12 आर एफ 1199 मधुन निगडी प्राधिकरण लेन नं.25 येथे जाऊन थांबण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार याचे पाठोपाठी साधारण 19.54 वा. पंच आम्ही व सापळा पथक शासकीय वाहन इर्टिगा गाडी क्र. एम एच 12 यु सी 4109 मधुन निगडी प्राधीकरण येथील जोगेश्वरी बॅक्टेट आणि लॉन्स समोरील सर्विस रोडच्या कडेला मोकळया जागेत 20:17 वा. पोहचलो. त्यावेळी तक्रारदार मनोरे हे त्यांचे वरील नमुद कारसह त्या ठिकाणी हजर होते. त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक कदम यांना फोन करुन ते बोलवतील त्या ठिकाणी पंच क्र.1 श्री. परेश राऊत यांचेसह जावुन लोकसेवक श्री एपीआय कदम यांची तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
त्यानंतर आम्ही सदर कारवाईदरम्यान वापरण्यात येणा-या शासकीय व्हाईस रेकॉर्डर शासकीय व्हिडीओ कॅमेरा व दोन मेमरीकार्ड याबाबत माहिती दिली. त्याचे सविस्तर वर्णन पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे. तसेच पडताळणी निवेदन, सापळा निवेदन आणि सापळा कारवाई झाल्यावर लोकसेवक यांचेकडुन लाच रक्कम हस्तगत करतेवेळी सदर कॅमे-याद्वारे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येणार असल्याचे तक्रारदार व पंच साक्षीदार यांना कळविले. त्यानंतर आमचे व तक्रारदार श्री मनोरे तसेच पंच क्र.1 श्री परेश राऊत व पंच क्र 2 श्री परदेशी यांचे पडताळणी निवेदन सापळा पथकाचे मदतीने हाताने लिहुन ते निवेदन 21:31 वा. ते 21/37 वाचे दरम्यान आमचेकडील शासकीय व्हाईस रेकॉर्डर मध्ये घेण्यात आले तसेच त्याचे व्हिडीओ रेकॉर्डीग करण्यात आले. सदर निवेदन पंचनाम्यासोबत जोडण्यात आले आहे. निवेदन घेतल्यानंतर लोकसेवक हे कार्यालयात हजर आहेत का? तसेच ते तक्रारदार यांना भेटण्याकरीता कोणत्या ठिकाणी बोलवणार आहेत याकरीता तक्रारदार यांना लोकसेवक यांचे मोबाईल फोनवर फोन करुन माहिती घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच सदरचे फोनवरील संभाषण शासकीय व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री मनोरे यांनी त्यांचे मो. क्र. 9028061111 यावरुन लोकसेवक कदम यांचे मो.क्र. 9594905013 यावर फोन केला फोन स्पिकरवर ठेवला, त्यावेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना निगडी येथील श्रीकृष्ण हॉटेल येथे भेटण्याकरीता बोलविले.

त्यानंतर तक्रारदार श्री मनोरे व लोकसेवक श्री कदम यांचे फोनवरील संभाषणामध्ये ठरल्याप्रमाणे श्री कृष्ण हॉटेल या ठिकाणी तक्रारदार व त्यांचे मित्र श्री गुंड यांना लोकसेवक एपीआय कदम यांचेकडे पडताळणीकामी पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच पंचनाम्यामध्ये ठरविल्याप्रमाणे तक्रारदार मनोरे यांचे चालक बोइनवाड हे त्यांचे ताब्यातील चारचाकी वाहनामधुन पंच क्र.1 श्री परेश राऊत यांना श्री कृष्ण हॉटेल येथे सोडुन सदर वाहन घेवुन सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आले. त्यानंतर शासकीय व्हाईस रेकॉर्डीग डिव्हाईस व व्हिडीओ रेकॉर्डची तक्रारदार व पंचांना माहिती देऊन पोशि महामुलकर यांनी माझे सुचनेनुसार व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला लावला. त्यानंतर तक्रारदार श्री. मनोरे व त्यांचा मित्र गुंड यांना तक्रारदार यांचे फॉच्युनर चारचाकी वाहनाने गाडी क्र. एम एच 12 आर एफ 1199 याने लोकसेवक श्री कदम यांची भेट घेण्याकरीता श्री कृष्ण हॉटेल निगडी या ठिकाणी रवाना केले. ती वेळ 22:29 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी पथक व पंच क्र.2 श्री परदेशी असे सदर ठिकाणी थांबून राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व त्यांचे मित्र श्री गुंड हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी त्यांचे चारचाकी वाहनातुन परत आले. त्यावेळी आम्ही पो.शि.महामुलकर यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला, ती वेळ 23.36 वा.ची होती. त्यानंतर लोकसेवक श्री कदम हे काही वेळ हॉटेलच्या बाहेरच थांबुन राहण्याची शक्यता असल्याचे तक्रारदार यांनी सांगितल्याने थोडया वेळानंतर तक्रारदार यांचे मित्र श्री गुंड यांना पंच क्र.1 यांना श्री कृष्ण हॉटेल येथुन पुन्हा माघारी घेऊन येण्याबाबत सांगितले. त्यानंतर काही वेळाने श्री गुंड हे पंच क्र. 1 श्री परेश राऊत यांना श्रीकृष्ण हॉटेल येथुन तक्रारदार यांचे वरील नमुद वाहनातुन सापळा पथक

थांबले ठिकाणी घेऊन आले.

त्यानंतर पंच क्र.1 श्री परेश राऊत यांना घडलेल्या हकीकतीबाबत विचारणा केली, तेव्हा त्यांनी पंच क्र. 2 श्री परदेशी यांचे समक्ष सांगीतले की, सुरुवातीला तक्रारदार श्री मनोरे, त्यांचे मित्र गुंड व लोकसेवक एपीआय श्री तानाजी कदम यांचेमध्ये अवांतर चर्चा व जेवणाच्या ऑर्डरविषयी बोलणे झाले. त्यानंतर मनोरे साहेबाच्या सांगण्यावरुन त्यांचे मित्र गुंड हे थोडयावेळाकरीता तेथुन निघुन गेले. त्यानंतर तक्रारदार मनोरे व लोकसेवक तानाजी कदम यांचेमध्ये कामाविषयी चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार श्री मनोरे लोकसेवक कदम यांना मी कन्फुज झालोय खर म्हणजे , कन्फयुज कसा झालोय, दोन केसेस येत .. आता तुमी सांगितल.. ते हे एका केसच सांगितल. की दोन केसच सांगितल.. मला.. असे विचारतात त्यावेळी लोकसेवक श्री कदम तक्रारदार यांना " दोन केसच एकदम निल" असे बोलतात. त्यावर तक्रारदार श्री मनोरे लोकसेवक कदम यांना "दोन केसच दहा लाख रुपये लय होतीय अमाऊंट" असे म्हणातात. त्यावर लोकसेवक श्री कदम हे तक्रारदार श्री मनोरे यांना म्हणतात, मग ठिके सांगा मग मी काय हे बघा मी त्यांना एकच गोष्ट सांगीतली सरांना मी काय बोललो ते माझे गाववाले हेत.. माझ्या प्रायोरीटीतले आहेत त्यांची अपेक्षा वेगळी राहणारे.. माझी प्रायोरीटी एकच हे.. सरांना मी फलेक्झीबल राहणारे असे बोललो त्यामुळे टेंशन घेवु नका" त्यावर तक्रारदार लोकसेवक यांना म्हणतात " आता मला एक सांगा आपल्या हयाच्यामध्ये आय ओ.. तुमी आहे का दुसरे कुणी आहे ृ, त्यावर लोकसेवक तक्रारदार यांना ृमी ओरीजनल आयओ आहेृ, असे तक्रारदार यांना सांगतात. त्यावर तक्रारदार लोकसेवक यांना विचारतात, ृटोके साहेब मदतनीस हेत मग ते ऑर्डर काय म्हणतात त्याला ते आम्हाला जे काढल (समजपत्र) त्याच्यावर जितेंद्र कदम साहेबांची सही आहे.ृ त्यावर लोकसेवक तक्रारदार यांना, ृसिनीअर पीआय पण काढु शकतात, मी नव्हतो बाहेर होतोृ, असे सांगतात. त्यानंतर तक्रारदार हे त्यांच्यावर दाखल झालेल्या दुस-या गुन्हयाबाबत चर्चा करुन "बर सर.. हयाच्यामध्ये तुमी जे अमाऊंट सांगितली.. दहा लाख ती ओव्हर ये.. आणि ती खरच, ती मी फॉलो करु शकत नाही.." असे लोकसेवक कदम यांना सांगतात. त्यावर लोकसेवक कदम " चालेल ठिकये ना. नका करु.." असे म्हणतात, त्यावर तक्रारदार श्री मनोरे लोकसेवक कदम साहेबंाना "बरोबर ये ना.. तुमीच बेस्ट संागा.. म्हणजे.. काय ही कसा.." असे म्हणतात. तेव्हा कदम साहेब "नाय नाय नाय.. मी काय म्हणतो.. तुम्हीच सांगा बेस्ट मी ती डन करतो..माझी एवढी तयारी ये.. असे म्हणतात. त्यानंतर काही वेळ तक्रारदार व लोकसेवक यांच्यामध्ये इतर केसबाबतचा अनुभवाबाबत चर्चा करतात. त्यावर लोकसेवक श्री कदम तक्रारदार मनोरे यांना "मी काय म्हणतो.. ऐकल का.. काम.. आता मला काय ... आता मला..मी काय म्हणल तुमाला दादा, तुमी ते काय म्हणतात, त्याला कालचा विषय सोडा...एकदम डन करुन टाका... डन टु डन करुन टाका.. मला हे बघा तुमच्याबद्यल आपुलकीये.. मला ते कसये माहीतीये का.. मला ते जास्त हे नाय आवडत.. तुमी मला संागा साहेब.. एक रुपया, दोन रुपये, तिन रुपये.. मी अस म्हणनार पण नाय, तुमी का बोललात." असे म्हणतात. त्यावर तक्रारदार लोकसेवक श्री कदम यांना "आता दहाचे तर विषय बाजुला ठेवुन देऊ, तो विषय नको घ्यायला.." असे म्हणतात. त्यानंतर काही वेळ दोघांमध्ये चर्चा होते त्यानंतर तक्रारदार श्री मनोरे लोकसेवक कदम यांना "आता आमच्या स्वखुशीने आम्ही तुमाला पाच करु." असे म्हणतात. त्यावर लोकसेवक कदम "ठिके.." असे म्हणतात. तसेच तक्रारदार मनोरे लोकसेवक श्री कदम यांना म्हणतात "आता त्यातले अडीच तुम्हाला आम्ही प्रथम देऊ.. निकाली काढल्यानंतर मग.." त्यावर लोकसेवक कदम तक्रारदार यांना "नाय नाय संपला विषय, ते निकालीचा विषय नाय" असे म्हणतात. त्यावर तक्रारदार मनोरे लोकसेवक कदम यांचेसोबत पुन्हा जुन्या केसबाबत चर्चा करतात. त्यानंतर तक्रारदार मनोरे हे लोकसेवक कदम यांना वरीष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी दिलेल्या समजपत्राबाबत विचारतात, तेव्हा लोकसेवक कदम तक्रारदार यांना "सगळयावर सिनीअर पीआय ची सही असते.. कुठला मॅटर असताना सगळ सिनीअर पीआय सही देतातृ असे सांगुन सिनियर पीआय पैसे नाही मागणार, असे म्हणतात. त्यानंतर तक्रारदार मनोरे व लोकसेवक तानाजी कदम यांचेमध्ये चर्चेदरम्यान वारंवार लाचेबाबत चर्चा होते. त्यानंतर साधारण अध्र्यातासाने तक्रारदार मनोरे यांचे मित्र उमेश गुंड हे परत तक्रारदार यांचेकडे येतात. त्यानंतर जेवणादरम्यान अवांतर चर्चा करतात. त्यानंतर तक्रारदार श्री मनोरे लोकसेवक श्री कदम यांना "मग उदया किती वाजता भेटताय.." असे विचारतात. तेव्हा कदम साहेब तक्रारदार यांना "हे तुमी सांगा तुमच्या हयान.." असे म्हणतात. त्यावर तक्रारदार मनोरे लोकसेवक कदम साहेबंाना "संध्याकाळी .. संध्याकाळी भेटु..मग." असे म्हणतात. त्यानंतर जेवण करुन तक्रारदार मनोरे, त्यांचे मित्र गंुड व लोकसेवक कदम हे हॉटेलबाहेर जातात. बाहेर गेल्यावरही 10 ते 15 मिनीटे तक्रारदार मनोरे व लोकसेवक कदम हे काहीतरी बोलतात. त्यानंतर तक्रारदार मनोरे व त्यांचे मित्र त्यांचे फॉच्र्युनर गाडीतुन निघुन जातात. यादरम्यान मी हॉटेलबाहेर थांबून होतो, त्यावेळी 15-20 मिनीटे लोकसेवक कदम हे हॉटेलबाहेर थांबुन इकडे तिकडे पाहत होते. त्यानंतर लोकसेवक कदम हे त्यांचे दुचाकीवरुन निघुन गेले. त्यानंतर तक्रारदार यांचे मित्र श्री गुंड मला श्री कृष्ण हॉटेल येथुन तक्रारदार यांचे फॉच्र्युनर गाडीतुन सापळा पथक थांबले ठिकाणी घेऊन येतात"

अशी हकीकत पंच क्र. 1 श्री परेश राऊत सांगतात.

त्यानंतर पोलीस निरीक्षक शिंदे यांनी आम्हा दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार श्री मनोरे यांना पडताळणी कारवाई कामी पाठविलेपासून परत येईपर्यंतची हकिकत विचारले असता त्यांनी सांगितले की, " मी व माझे मित्र श्री गुंड असे माझे फॉच्र्युनर कार ने निगडी येथील श्री कृष्ण व्हेज हॉटेलमध्ये पोहचून मी माझे वाहन पार्क केले. त्यावेळी पंच क्र 1 राऊत हे हॉटेलचे बाहेरील परिसरामध्ये थांबुन राहीले होते. त्यानंतर मी व माझा मित्र गुंड असे आम्ही हॉटेलमध्ये गेलो, तेथुन मी माझा मो.क्रं. 9028061111 यावरुन कदम साहेबंाच यांचा मो.क्रं. 9594905013 यावर व्हॅाटसअॅप कॉल करुन माझे मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी कदम साहेबंानी माझा कॉल रिसीव केला. त्यावेळी ते मला "समोरचेय." असे म्हणाले असता मी त्यांना "समोरच का" असे बोललो. त्यावर कदम साहेब मला "हे काय आलोच.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "बर बर.. बर या आतमध्ये या.." असे म्हणालो. त्यानंतर मी व गंुड असे पुन्हा बाहेर आलो त्यावेळी कदम साहेब हॉटेलबाहेर होते. आम्ही त्यांचेकडे गेलो व तेथेच असणा-या पंचाना डोळयाने खुणावुन कदम साहेबाबाबत इशारा केला. त्यानंतर मी, माझा मित्र गुंड व कदम साहेब असे आम्ही हॉटेलमध्ये जावुन बसलो. आमचेमागोमाग पंच राऊत तेथे आले. व त्यावेळी पंच क्र.1 श्री परेश राऊत हे आमचे मागोमाग हॉटेमलधील कदम साहेबांच्या मागच्या टेबलावर येऊन बसले. सुरुवातीला मी, माझा मित्र गुंड व लोकसेवक एपीआय श्री तानाजी कदम आमचेमध्ये अवांतर चर्चा व जेवणाच्या ऑर्डरविषयी बोलणे झाले. त्यानंतर मी माझा मित्र गुंड याला थोडयावेळाकरीता तेथुन बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व लोकसेवक तानाजी कदम आमचेमध्ये कामाविषयी चर्चा झाली त्यावेळी मी लोकसेवक कदम यांना ृ मी कन्फुज झालोय खर म्हणजे , कन्फयुज कसा झालोय, दोन केसेस येत.. आता तुमी सांगितल.. ते हे एका केसच सांगितल. की दोन केसच सांगितल.. मला.. असे विचारले असा कदम यांनी मला " दोन केसच एकदम निल" असे सांगितले. त्यावर मी कदम साहेबांना "दोन केसच दहा लाख रुपये लय होतीय अमाऊंट" असे म्हणालो. त्यावर लोकसेवक श्री कदम मला म्हणाले, ृमग ठिके, सांगा मग, मी काय ...हे बघा, मी त्यांना एकच गोष्ट सांगीतली, सरांना मी काय बोललो, ते माझे गाववाले हेत.. माझ्या प्रायोरीटीतले आहेत, त्यांची अपेक्षा वेगळी राहणारे.. माझी प्रायोरीटी एकच हे.. सरांना मी फलेक्झीबल राहणारे असे बोललो, त्यामुळे टेंशन घेवु नका" त्यावर मी कदम साहेबांना बोेलला की, " आता मला एक सांगा आपल्या हयाच्यामध्ये आय ओ.. तुमी आहे का दुसरे कुणी आहे ृ, त्यावर कदम यांनी मला ते स्वत: ओरजीनल आयओ असल्याचे सांगितले. त्यावर मी कदम साहेबाना विचारले की, ृटोके साहेब मदतनीस हेत मग ते ऑर्डर काय म्हणतात त्याला ते आम्हाला जे काढल (समजपत्र) त्याच्यावर जितेंद्र कदम साहेबांची सही आहे.ृ त्यावर कदम साहेबांनी मला, ृसिनीअर पीआय पण काढु शकतात, मी नव्हतो बाहेर होतोृ, असे सांगतले. त्यानंतर माझ्या जुन्या केसबाबत चर्चा केली. त्यानंतर मी कदम साहेबांना म्हणालो "बर सर.. हयाच्यामध्ये तुमी जे अमाऊंट सांगितली.. दहा लाख ती ओव्हर ये.. आणि ती खरच, ती मी फॉलो करु शकत नाही.." असे म्हणालो. त्यावर कदम साहेब " चालेल ठिकये ना. नका करु.." असे म्हणतात, त्यावर मी कदम साहेबंाना "बरोबर ये ना.. तुमीच बेस्ट संागा.. म्हणजे.. काय ही कसा.." असे म्हणतात. तेव्हा कदम साहेब मला "नाय नाय नाय.. मी काय म्हणतो.. तुम्हीच सांगा बेस्ट मी ती डन करतो..माझी एवढी तयारी ये.. असे म्हणतात. त्यानंतर काही वेळ तक्रारदार व लोकसेवक यांच्यामध्ये इतर केसची चर्चा करतात. व कदम साहेब मला ृआता मला..मी काय म्हणल तुमाला दादा, तुमी ते काय म्हणतात, त्याला कालचा विषय सोडा...एकदम डन करुन टाका... डन टु डन करुन टाका.. मला हे बघा तुमच्याबद्यल आपुलकीये.. मला ते कसये माहीतीये का.. मला ते जास्त हे नाय आवडत.. तुमी मला संागा साहेब.. एक रुपया, दोन रुपये, तिन रुपये.. मी अस म्हणनार पण नाय, तुमी का बोललात." असे म्हणतात. त्यावर मी श्री कदम यांना "आता दहाचे तर विषय बाजुला ठेवुन देऊ, तो विषय नको घ्यायला, आता आमच्या स्वखुशीने आम्ही तुमाला पाच करु." असे म्हणालो. त्यावर लोकसेवक कदम मला "ठिके.." असे म्हणाले. त्यानंतर मी श्री कदम साहेबांना "आता त्यातले अडीच तुम्हाला आम्ही प्रथम देऊ.. निकाली काढल्यानंतर मग तुम्हाला अडीच देवु" असे सांगतात. त्यावर कदम सर मला "नाय नाय संपला विषय, ते निकालीचा विषय नाय" असे म्हणतात. त्यानंतर अवांतर चर्चा करुन मी कदम साहेबांना वरीष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी दिलेल्या समजपत्राबाबत विचारले, तेव्हा कदम साहेबांनी मला "सगळयावर सिनीअर पीआय ची सही असते.. कुठला मॅटर असताना सगळ सिनीअर पीआय सही देतात, असे सांगुन सिनियर पीआय पैसे नाही मागणार, असे सांगितले. त्यानंतरही तानाजी कदम माझेसोबत इतर चर्चेसोबत लाचेच्यारकमेबाबत बोलतात. त्यानंतर साधारण अध्र्यातासाने मी माझा बाहेर गेलेला मित्र उमेश गुंड यांना परत बोलविले. त्यानंतर जेवणादरम्यान आमच्यामध्ये अवांतर चर्चा होते. त्यानंतर मी श्री कदम यांना "मग उदया किती वाजता भेटताय.." असे विचारले असता कदम साहेब मला "हे तुमी सांगा तुमच्या हयान.." असे म्हणतात. त्यावर मी कदम साहेबंाना "संध्याकाळी .. संध्याकाळी भेटु..मग." असे म्हणालो. त्यानंतर जेवण करुन मी माझे मित्र

गं◌ुड व लोकसेवक कदम आम्ही तिघेही हॉटेलबाहेर जातो. बाहेर गेल्यावरही 10 ते 15 मिनीटे माझ्यामध्ये व कदम साहेबांमध्ये उदयाच्या मिटिंगबद्दल चर्चा होते. त्यानंतर मी माझा मित्र गं◌ुड यांचेसोबत आमच्या गाडीतुन सापळा पथक थांबले त्या ठिकाणी आलो. यादरम्यान पंच 1 राऊत हे हॉटेलबाहेर थांबून होते, 15-20 मिनिटानंतर माझे मित्र श्री गुंड हे पंच 1 राऊत यांना श्री कृष्ण हॉटेल येथुन आमचे फॉच्र्युनर गाडीतुन सापळा पथक थांबले ठिकाणी घेऊन आले, अशी हकिकत आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली.

त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंचासमक्ष आम्ही ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली असुन त्यांचे सविस्तर संभाषण पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

झालेल्या पडताळणी करावाईवरुन लोकसेवक कदम यांनी तक्रारदार यांचेविरुध्द दाखल असणारे दोन तक्रारअर्ज वरिष्ठांना सांगुन फाईल करुन घेण्याकरीता वरिष्ठांकरीता सुरुवातील 10,00,000/- रुपये व तडजोडी अंती 5,00,000/- रुपयांची लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदरच्या लाच रक्कमेपैकी अगोदर 2,50,000/- रुपये व अर्ज फाईल केल्यानंतर 2,50,000/- रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविली. पडताळणी कारवाईदरम्यान लोकसेवक तानाजी कदम यांनी मागितलेली सदर रक्कम ही लाच असल्याची आमची खात्री झाली.

त्यानंतर दिनांक 14/05/2026 रोजी लोकसेवक एपीआय तानाजी कदम यांनी तक्रारदार यांना कोणताही संपर्क केला नाही. तसेच तक्रारदार यांनी त्याचे विरोधात पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या दोन्ही तक्रारअर्जाबाबत पोलीस स्टेशन मधुन माहिती घेतली असता त्यांचे विरोधात असलेले दोन्ही अर्ज हे आर्थिक गुन्हे शाखा येथे वर्ग केल्याचे तक्रारदार याना समजले. लोकसेवक एपीआय तानाजी कदम यांना दिनांक 13/05/2026 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान संशय आल्याने त्यांनी त्यानंतर तक्रारदार यांचेशी कोणताही संपर्क केला नाही. तसेच यापुढेही लोकसेवक एपीआय तानाजी कदम त्यांनी मागणी केलेले 5,00,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार श्री मणोरे यांच्याकडुन स्विकारणार नाहीत. तरी लोकसेवक एपीआय तानाजी कदम यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे. असे तक्रारदार यांनी सांगितल्याने तसा त्यांचा सविस्तर जबाब घेण्यात आला आहे.

तरी लोकसेवक श्री तानाजी कदम, सहा.पोलीस निरीक्षक, नेमणुक, चाकण उत्तर पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, (वर्ग-2) यांनी सरकारी पदाचा र्दुउपयोग करुन तक्रारदार श्री. माधव मलिकार्जुन मनोरे, वय -54 वर्षे, व्यवसाय – जमिन खरेदीविक्री, रा. 15, एम स्ट्रीट सोसायटी, रहाटणी, पुणे यांचेकडे लोकसेवक सहा.पोलीस निरीक्षक श्री कदम यांनी तक्रारदार यांचे विरुध्द दाखल असणा-या दोन तक्रारअर्ज निकाली काढण्याकरीता सहा पोलीस निरीक्षक तानाजी कदम यांनी स्वत: तपासी अधिकारी असुन वरीष्ठांकडुन अर्ज फाईल क#न घेतो, असे सांगुन वरीष्ठांकरीता सुरुवातील 10,00,000/- रुपये व तडजोडी अंती 5,00,000/- रुपयांची लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदरच्या लाच रक्कमेपैकी पहिला टप्प्यातील 2,50,000/- रुपये अगोदर व 2,50,000/- #पये अर्ज फाईल झाल्यानंतर स्वीकारण्याची तयारी दर्शविली. म्हणुन श्री तानाजी कदम, सहा.पोलीस निरीक्षक, नेमणुक, चाकण उत्तर पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, (वर्ग-2), यांचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला..

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MAHESH SHANKARRAO BANSODE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** MAHESH SHANKARR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)